# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०८/०८/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०७/२०१६ रोजीचे इतिवृत्त माहितीस्तव. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २५/०७/२०१६ रोजीचे इतिवृत्त माहितीस्तव आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ९४ मधील निर्मळ नाक्यावर दुतर्फा रस्ता रुंदीकरण करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वृंदेश पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील जि.प.शाळेतील व अनाथ आश्रमातील मुलींना मासिक पाळीचे पॅड (सॅनेटरी नॅपकीन) पुरवठा करणेबाबत. | **ठराव :-** वयात येणाऱ्या मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर योजना चांगली असून या योजनेचा मुलींना लाभ दिल्यास त्या कुंटूबांनी आर्थिकदृष्ट्या एकप्रकारची मदत होऊ शकतो. याकरीता महानगरपालिका हद्दीतील जि.प.शाळेत शिकत असलेल्या इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यीनींना तसेच महानगरपालिका हद्दीतील आदिवासी प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या शाळेतील व खाजगी आश्रम शाळेतील निवासी व अनिवासी मुलींना या योजनेचा लाभ देण्यात यावा. सदरचे साहित्य वाटप करतांना तज्ञ डॉक्टरांची नेमणूक करुन त्या मुलींना याबाबत मार्गदर्शन करण्यांत यावे. या करीता व्हिसपर्स या मान्यता प्राप्त कंपनीच्या (व्हिसपर्स चॉईस) या प्रकारच्या बाजार भावाप्रमाणे नॅपकिन पॅड वाटप करण्यांत यावा. तसेच पॅकेटवर महानगरपालिकेचा लोगो सहित छापून नॉट फॉर सेल असे नमुद करण्यांत यावे. वाटप करतांना प्रत्येक ३ महिन्याच्या कालावधीसाठी साहित्य वाटप करण्यात यावे. साहित्य वाटप करणेकरीता प्रत्येक वेळी महानगरपालिकेच्या वाहन विभागामार्फत वाहने व आरोग्य विभागामार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यांत यावे. याकरीता (व्हिसपर्स चॉईस) पॉकेटस मागविण्याकरीता इ निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणेकामी येणाऱ्या ३३,१२,०००/- खर्चास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** |
| ४ | शासन मान्यता प्राप्त वाचनालयांना वार्षिक अनुदान मंजुर करणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयावर आजच्या मा.स्थायी समितीच्या सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार ज्या शासन मान्यता प्राप्त सार्वजनिक वाचनालयाची सन २०१५-१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिकेकडे वार्षिक अनुदान मिळणेकामी अर्ज सादर केलेले आहेत. अशा वाचनालयांना त्यांचे वर्गवारीनुसार व मा.सर्वसाधारण सभा ठराव |

| | | |
|---|---|---|
| | | क्र.१९ दिनांक २०/०१/२०१६ मान्यतेनुसार संस्था अनुदान व अन्य सहाय्य मिळणेकामी निश्चित केलेल्या धोरणानुसार अनुदान देणेकामी सर्वानुमते मंजूरी देत आहे. त्यापैकी श्री.विठ्ठल सस्थानाचे गीता वाचनालय हे ग्रंथालय जेष्ठ नागरीकांना वाचनालय/ग्रंथालयाची सेवा विनाशुल्क उपलब्ध करुन देणार नसल्याचे हमी पत्र सदर संस्थेने सादर केलेले आहे. सबब सदर ग्रंथालयास सन २०१६-१७ या वर्षाकरीता प्रतीपुर्ती म्हणून ठरविण्यांत आलेले आलेले २५,०००/- अनुदान न देता मूळ अनुदान रु. ७५,०००/- देणेकामी आणि वर प्रस्तावित इतर प्राप्त असलेल्या शासन मान्य सार्वजनिक वाचनालयांना सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचे मंजूर अनुदान व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात प्रतिपुर्तीसह अनुदानाची रक्कम अदा करणेसाठी होणाऱ्या रक्कम रु. २५,२५,०००/- इतक्या आजची सभा प्रशासकीय व वित्तीय व तांत्रित मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर   सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ५ | सन २०१६-१७ ह्या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या स्मशानभुमीकरीता कास्ट आयर्नच्या शवदाहिन्या पुरवठा करणेकामी कमी दराच्या निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. (बी-२ निविदा) | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता मे. गायत्री इंजिनिअर्स ह्यांची निविदा (वाटाघाटीने) सर्वांत कमी व वाजवी आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.स्थायी समितीवर मान्यतेसाठी ठेवणेंस मा.आयुक्त ह्यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करुन निविदा दरास व संविदा करणेसाठी ही सभा अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अजीत नाईक   सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ६ | वसई-विरार शहर महानगरपालिका, नालासोपारा कार्यक्षेत्रातील सोपारा हद्दितील बाजारकर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता प्राप्त झालेल्या ज्यादा देकाराच्या फेर ई-निविदा स्विकृत करणेबाबत. (अपंग व्यक्तींसाठी आरक्षित) | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील मौजे सोपारा (अपंग व्यक्तींकरीता) येथील दैनिक बाजार कर वसुली कामी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता ११ महिन्यांसाठी प्राप्त झालेल्या प्रथम फेर-निविदा इतर निविदाधारकापेक्षा श्री. विनोद सोलंकी यांची रक्कम रु. २३,६१,५००/- ची सर्वात जास्त देकाराची निविदा प्राप्त झाली असून जादा देकाराची निविदा स्विकृत करुन संविदा करणेसही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफिफ शेख   सूचक :- मा.श्री. वृंदेश पाटील** |